दि.२२.०२.२०१९

# प्रेसनोट

आज दि. २२/२/२०१९ रोजी पुणे शहर पोलीस आयुक्त **मा.डॉ.के वेकंटेशम्** यांचे मार्गदर्शनाखाली पुणे शहर पोलीस दल संकेतस्थळाचे www.punepolice.gov.in नुतनीकरण करण्यात आले आहे. सदरचे संकेतस्थळ हे GIGW (Guideline for Indian government website) च्या मार्गदर्शक सुचनांनुसार विकसीत करण्यात आलेले आहे. सदरचे संकेस्थळ हे डेस्कटॉप, मोबाईल, टॅब, आयपॅड, यांसारख्या आधुनिक उपकरणांमध्ये सहजरित्या उघडता येवु शकते. संकेतस्थळ हे नागरिकांना सहज हाताळणे योग्य (User Friendly) लोकाभिमुख बनविण्यात आले आहे. संकेतस्थळाच्या नुतनीकरणांमध्ये सायबर सुरक्षेवर विशेष भर देण्यात आलेला आहे. सदरचे संकेतस्थळ दृष्टिहीन व्यक्तींना हाताळण्यास सोयीचे व्हावे याकरीता Screen Reader Software चा वापर करण्यात आलेला आहे.

यापुर्वीचे संकेतस्थळ हे केवळ इंग्रजी भाषेमध्ये तयार करण्यात आलेले होते.परंतु GIGW यांच्या मार्गदर्षक सुचनेप्रमाणे नुतनीकरण केलेले संकेतस्थळ हे **मराठी व इंग्रजी** या दोन्ही भाषेत उपलब्ध आहे. सदर संकेतस्थळावर खाली नमुद विषयांची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. **जसे-** वरिष्ठ पोलीस अधिकारी, पोलीस ठाणे यांचे दुरध्वनी क्रमांक, दैनंदिन वृत्तांकन, पाहिजे/फरारी आरोपींची माहिती, अॅट्रॉसीटी अॅक्ट केसेसची माहिती, एनसीआरबी यांचे कडील सांख्यीकी माहिती, ड्रंक अँड ड्राईव्ह केसेस, बेवारस मयत , हरविलेले व्यक्ती बाबतची माहिती, अद्ययावत माहिती, नागरिकांना सुचना, भरती प्रक्रिया, वाहतुकीमध्ये बदल, महत्वाचे शासकिय संकेतस्थळांची लिंक्स्, माहिती अधिकार, निविदा, इ.

तसेच नागरिकांकरीता संकेतस्थळावर विविध ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. **जसे-** लॉस्ट अँड फाउंड (हरविलेल्या /सापडलेल्या दस्ताऐवज,वस्तुंची नोंदणी),भाडेकरुंची नोंदणी , ऑनलाईन तक्रार, चोरीस गेलेले वाहन व बेवारस वाहनांची नोंद,वाहन अपघात नोंद, पुणे शहर पोलीस दलाचे फेसबुक, ट्विट्र व व्हॉटस् ॲप क्रमांक इ.

तरी नागरिकांनी या नवीन संकेतस्थळाचा वापर करून त्याची मदत घ्यावी.

पुणे शहर पोलीस दल संकेतस्थळाचे नुतनीकरणास पुणे शहर पोलीस आयुक्त मा.डॉ.के वेकंटेशम्, सह आयुक्त श्री. शिवाजी बोडखे, अपर पोलीस आयुक्त श्री. प्रदिप देशपांडे, पोलीस उपआयुक्त श्रीमती.ज्योतीप्रिया सिंह, पोलीस उपआयुक्त श्री.शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलीस आयुक्त श्री.निलेश मोरे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. पुणे शहर पोलीस दलाचे नविन संकेतस्थळ अद्ययावत करण्याचे कामकाज संगणक विभाग, गुन्हे शाखेच्या सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती.संगिता देवकाते यांचे देखरेखखाली पार पाडण्यात येत आहे.